# बुरशीनाशकांचा योग्य वापर

द्राक्ष सल्ला

डॉ. सुजोय साहा,
डॉ. आर. जी. सोमकुंवर,
डॉ. रत्ना ठोसर

रोगांचे व्यवस्थापन हे प्रामुख्याने बुरशीनाशकांच्या सुयोग्य वापरावर अवलंबून असते. हवामान बदलामुळे अनेक द्राक्ष पट्ट्यात डाऊनी मिल्ड्यू आणि अँथ्रॅकनोज सारख्या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. लवकर छाटणी केलेल्या बागांमध्ये पावडरी मिल्ड्यूचे (भुरी) प्रमाण हळूहळू वाढताना दिसत आहे. पीकवाढीच्या अवस्थेनुसार बुरशीनाशकांची योग्य फवारणी हा रोग व्यवस्थापनातील महत्त्वाचा भाग आहे. फवारणी करतेवेळी खालील बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

- फवारणी करण्याआधी स्प्रेअर यंत्राची तपासणी करणे गरजेचे आहे. नोझल, व्हॉल्व्ह आणि डिस्चार्ज पाइपची वेळोवेळी तपासणी करावी. नोझल आवश्यकतेनुसार बदलावेत.
- फवारणी केलेल्या पानांवरील भाग ओळखण्यासाठी पाणी शोषून घेणारा कागद किंवा फ्लोरोसेंट डायद्वारे तपासणी करावी. बऱ्याच वेळा दाट कॅनॉपीमुळे फवारलेली बुरशीनाशके फांद्यापर्यंत आतमध्ये पोचत नाहीत. भुरी रोगाचा द्राक्ष घडावरील प्रादुर्भाव रॅचिसपासून सुरू होतो. त्यामुळे रोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी बुरशीनाशके रॅचिसपर्यंत पोहोचणे गरजेचे असते.
- फवारणी यंत्रातील बुरशीनाशक ढवळणारे उपकरण (अॅजिटेटर) योग्यरीत्या कार्यरत असल्याची खात्री करावी. जेणेकरून बुरशीनाशकांचे अपेक्षित मिश्रण तयार होईल. बुरशीनाशके योग्यप्रकारे न मिसळल्यास, रोगांचे प्रभावी आणि एकसमान नियंत्रण होत नाही.
- फवारणी द्रावणात पाण्याचे प्रमाण योग्य असावे. साधारणपणे १ हेक्टर क्षेत्रासाठी १ हजार लिटर पाण्याची शिफारस केली जाते. बुरशीनाशकांचा डोस हा प्रति एकर क्षेत्रावर आधारित असावा. 'ग्रॅम प्रति लिटर पाणी' या प्रमाणात नसावा. ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणाचे अनुसरण केल्यास, पाण्याचे प्रमाण देखील नमूद केलेले असावे.
- फवारणी द्रावणाच्या टाकीमध्ये बुरशीनाशके, कीटकनाशके आणि वाढ संप्रेरके मिसळण्याचे प्रमाण वाढत आहे. काही वेळा पाण्यात विरघळणारी पोषकतत्त्वे बुरशीनाशकांसोबत मिसळली जातात. त्यामुळे हे काटेकोरपणे टाळले पाहिजे. भिन्न गटातील रसायनांची सुसंगता पूर्णपणे समजून न घेता, टाकीमध्ये त्यांचे एकत्र मिश्रण करून वापरल्यामुळे पिकाचे गंभीर नुकसान होण्याची शक्यता असते. द्राक्ष वेलीवर जास्त प्रमाणात रसायनांचा वापर केल्यामुळे वेली अधिक नाजूक आणि इतर जैविक घटकांना अधिक संवेदनशील होऊ शकतात.



प्रभावी रोग नियंत्रणासाठी शिफारशीत बुरशीनाशकांची आवश्यकतेनुसार फवारणी करावी.

- जैविक नियंत्रके जसे, ट्रायकोडर्मा, बॅसिलस इत्यादी फवारणी द्रावण तयार करण्याच्या टाकीमध्ये बुरशीनाशकांसोबत एकत्रित मिसळू नये. अशा टँक मिक्सची शिफारस करण्यापूर्वी जैविक नियंत्रकांचा बुरशीनाशकांसोबतच्या वापराचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे.
- बुरशीनाशक फवारणी आणि जैविक नियंत्रकांच्या वापरामध्ये किमान ४८ ते ७२ तासांचे अंतर असावे.
- बुरशीनाशकांचा वापर करण्यापूर्वी त्यावरील लेबलची तपासणी करावी.
- फवारणीवेळी नाक, डोळे, तोंड आणि डोके पूर्णपणे झाकले जाईल अशा प्रकारचे संरक्षणात्मक पोशाख परिधान करावा. रिकामे कीटकनाशकांचे डबे, पाकिटे पिण्याच्या पाणी स्रोतांजवळ टाकू नयेत, त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. तसेच लहान मुलांपासून दूर ठेवावेत.
- फवारणी करताना धूम्रपान किंवा तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळावे.

– डॉ. सुजोय साहा, ७०६६२४०९४६
(राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि. पुणे)